'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Issue No. 107- Self Employment : A Tool of Economic Development
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
February-2019

# स्त्री रोजगार प्रशिक्षण कार्यक्रम : एक अभ्यास

## (मासूम संस्था,पुणे संदर्भ)

डॉ. निकम सुजाता शंकर
(M.A,M.Phil,SET,Ph.D)
पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे,
अण्णासाहेब मगर महाविद्यालय,हडपसर पुणे-४११०२८
Contact No.- 9730025799
E-Mail ID- ssnikam2@gmail.com

**प्रस्तावना**

विवीध देशांमध्ये प्राचीन काळापासुन स्त्रियांची कुटूंबाच्या पालनपोषणामध्ये महत्त्वाची भूमिका राहिलेली आहे. घरातील पुरूष युध्दावर व इतरकार्यासाठी जात असत तेव्हा उर्वरीत कुटूंब सदस्यांना शेतीकाम करून पालनपोषणाची जबाबदारी स्त्रिया स्वीकारीत असत. इतिहासाच्या कुठल्याही वळणावर नजर टाकली तरी आपल्याला सामर्थ्यवान, धैर्यशील, बुध्दीमान स्त्रियांची उदाहरणे दिसतात. म्हणजेच स्त्रियांनी कौटुंबिक घरकामामध्येच नाही तर विविध क्षेत्रात आपले सामर्थ्य सिध्द केले आहे. एकोणिसाव्या शतकात स्त्रियांचे जीवन पुर्णपणे परावलंबी, दुय्यम दर्जाचे होते.त्यांना शिक्षणाचा अधिकार नव्हता. किंबहुना, आयुष्यातील कोणताही निर्णय घेण्याचा अधिकार नव्हता. घरातील किंवा समाजातील निर्णय प्रक्रियेत त्यांना स्थान नव्हते. घरातील किंवा समाजातील निर्णय प्रक्रियेत त्यांना स्थान नव्हते. आर्थिक दृष्टया स्वालंबन तर त्या काळात खूप दुरचा विचार मानावा लागेल. परंतु, विविध समाजसुधारकांच्या प्रयत्नातून स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार कालांतराने प्राप्त झाला पण त्याचबरोबर समाजसुधारकांच्या प्रयत्नांची परिणीती स्त्रियांच्या उच्च शिक्षणातील सहभागात झाली. शिक्षण आणि व्यवसायाच्या क्षेत्रात स्त्रियांनी पुरूषांची मक्तेदारी समजली जाणारी कितीतरी क्षेत्रे काबीज केली. जिद्द व चिकाटीच्या जोरावर उच्चशिक्षण, तांत्रिक व व्यावसायिक शिक्षणातही पुरूषांच्या बरोबरीने स्थान पटकाविलेले दिसून येते.स्त्रिया जितक्या मोठया प्रमाणात शिक्षण प्रक्रियेत सहभागी झाल्या तितक्याच विविध क्षेत्रातील नोकरीच्या संधी त्यांना प्राप्त झाल्या. त्यातूनच स्त्रियांच्या आर्थिक स्वालंबनाची गरज हा विषय महत्त्वपुर्ण होत गेला. प्रामुख्याने दुसऱ्या महायुध्दानंतर जागतीक आर्थिक मंदीच्या कालावधीत(१९२९–१९३३) प्रथमच स्त्रियांना नोकरीची संधी मिळाली खास पुरूषांची मानली गेलेली क्षेत्रे स्त्रियांसाठी मोकळी झाली. नंतर वाढत्या महागाईमुळे स्त्रियांची नोकरी ही कुटूंबाने आर्थिक सधनतेसाठी स्विकारलेली आहे .

जर चालू सध्याच्या काळाचा विचार केला तर कोणत्याही कुटूंबात मग ते मध्यमवर्गीय, उच्चवर्गीय किंवा सर्वसाधारण किंवा दारिद्रय रेषेखालील कुंटूंब असले तरी स्त्रियांचे आर्थिक स्वावलंबन गरजेचे झाले आहे. जर कुटूंबात प्रतिष्ठेचे स्थान मिळवायचे असेल आणि आपल्या कुटूंबाचा राहणीमानाचा स्तर उंचावयाचा असेल तर घरातील स्त्री—पुरूष दोघांनीही आर्थिकदृष्टया हातभार लावणे काळाची गरज आहे. सुशिक्षित स्त्रियांनी आपल्या शिक्षणाचा उपयोग कुटूंबाचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी केला पाहिजे हा विचार पुढे येत आहे. स्त्रियांचे आर्थिक स्वावलंबन हे स्त्रियांच्या स्वत:च्या व्यक्तीमत्त्व विकासासाठी गरजेचे आहे.

आज उच्चशिक्षित स्त्रिया नोकरी व्यवसायाच्या माध्यमातून आर्थिक स्वावलंबी होण्याचा प्रयत्न करीत आहेत. तर अशिक्षित, गरीब कुटूंबातील स्त्रिया शेती व संबंधित व्यवसायात काम मिळवून अंगमेहनतीची कामे करून आर्थिक स्वावलंबन मिळविण्याचा प्रयत्न करीत आहेत. म्हणजेच स्त्री मग ती सुशिक्षित असो की अशिक्षित, श्रीमंत वर्गातील असो की गरीब प्रत्येक स्त्रीने अर्थउत्पादक कार्यात सहभाग घेवून आर्थिक स्वावलंबन प्राप्त केले तर अशी स्त्री कुंटूंबात स्वत:चे स्थान निर्माण करू शकेल. निर्णय घेण्यास सक्षम समजली जाईल. स्त्रिचा स्वत:चा व्यक्तीमत्त्व विकास घडून येईल. त्याचबरोबर कुटूंबाचा आर्थिक स्तर उंचावण्यास हातभार



Scanned by CamScanner

...गोल स्त्रियांच्या आर्थिक स्वावलंबनाची गरज ही सध्याच्या काळाची गरज आहे. परंतु ज्या स्त्रिया शिक्षित ...तीत, आणि आर्थिक दृष्ट्या ज्यांच्याकडे पुरेसे पाठबळ ही नाही अशा स्त्रियांचे काय? अशा स्त्रियांना आर्थिक स्वावलंबन प्राप्त करून देण्यासाठी सरकारने विविध रोजगार प्रशिक्षण कार्यक्रम योजना सुरू केल्या आहेत. रोजगार प्रशिक्षण कार्यक्रमामुळे स्त्रिया स्वयंरोजगार प्राप्त करून आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी होऊ शकतात. परंतु, ...धी अकार्यक्षम प्रशिक्षणामुळे, कधी अपुऱ्या साधनसंपत्तीमुळे तर कधी अधिकाऱ्यांच्या नकारात्मक दृष्टीकोनामुळे सरकारी योजना राबविताना विविध अडचणी येतात. ही उणीव भरून काढण्यासाठी अनेक बिगर सरकारी संस्था ...ळव्द महिला विकास मंडळे ही कार्यरत आहेत. आणि सरकारवरच अवलंबून न राहता सामाजिक प्रयत्नातून महिलांच्या विकास योजना राबविण्यात येऊ लागल्या.सध्या अनेक बिगर सरकारी संस्था विविध स्त्री रोजगार प्रशिक्षण कार्यक्रम राबवून स्त्री विकास साध्य करण्यासाठी प्रयत्नशील आहेत अनेक बिगर सरकारी संस्था सध्या स्त्री सामाजिक व आर्थिक विकासासाठी महत्त्वाची भूमिका बजावित आहेत. प्रामुख्याने ग्रामीण भागातील अशिक्षित व त्यामुळे नोकरी करू न शकणाऱ्या स्त्रियांना आर्थिक स्वावलंबन मिळवून देण्यासाठी स्वयंसेवी संस्था मार्फत रोजगार प्रशिक्षण कार्यक्रम राबविले जातात. रोजगार प्रशिक्षण कार्यक्रमांचा खर्च स्त्रियांच्या आर्थिक स्वावलंबनासाठी हातभार लागतो का? त्यामुळे त्यांच्या कुटुंबाच्या राहणीमान सुधारणा झाली आहे काय? या प्रश्नाचे उत्तर मिळविण्यासाठी बिगर सरकारी संस्था(छळव) म्हणून श्मासूमश या महिला सर्वांगीण विकास संस्थेमार्फत चालविल्या जाणाऱ्या स्त्री रोजगार प्रशिक्षण कार्यक्रमःएक अभ्यास )मासूम संस्था,पुणे संदर्भात(योजला होता.

## मासूम संस्थेचे कार्यक्षेत्र

अनेक बिगर सरकारी संस्था सध्या स्त्री विकासासाठी महत्त्वाची भूमिका बजावित आहेत. प्रामुख्याने ग्रामीण भागातील अशिक्षित व त्यामुळे नोकरी करू न शकणाऱ्या स्त्रियांना आर्थिक स्वावलंबन मिळवून देण्यासाठी स्वयंसेवी संस्थांमार्फत रोजगार प्रशिक्षण कार्यक्रम राबविले जातात. मासूम या संस्थेची निवड केली कारण मासूम ही संस्था १९८७ पासून महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यरत संस्था आहे. आणि प्रामुख्याने पुरंदर तालुक्यातील पुर्व भागात जेथे पावसाचे प्रमाण कमी आहे. तसेच अहमदनगरमधील पारनेर तालुक्याच्या आदिवासी भागात व राळेगणसिध्दी परिसरातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल भागात कार्य करीत आहे. त्यामुळे सहेतुक नमुना निवड पध्दतीच्या आधारे मासूम या सेवाभावी संस्थेची निवड केली. मासुमचे अनेक उपक्रम आहेत. त्यापैकी शिवणकाम प्रशिक्षण हा उपक्रम निवडला मासूम या स्वयंसेवी संस्थेचे कामकाज पुणे जिल्हयातील पुरंदर तालुक्यात केंद्रीत झाले आहे. त्यामुळे पुरंदर तालुक्याची कार्यक्षेत्र म्हणून निवड केली. पुरंदर तालुक्यातील ११८ गांवापैकी मासूम संस्थेच्या स्त्री रोजगार प्रशिक्षण कार्यक्रमाचा एक वर्ग संस्थेने निवडलेल्या १८ गावांमध्ये कार्य करतो. व दुसरा फिरता वर्ग १८ गावांच्या बाहेर कार्य करतो. संस्थेचे क्षेत्र, कामकाज संस्थेचे निवडलेल्या १८ गावांमध्ये प्रामुख्याने केंद्रीत असल्याने त्या शिवणवर्गाची म्हणजे १८ गावांची निवड केली म्हणजेच पुणे जिल्हयातील पुरंदर तालुक्यातील १८ गांवाचा समावेश संशोधकाने कार्यक्षेत्रामध्ये केला आहे. परतु, अभ्यास मासूम संस्थेच्या स्त्री रोजगार प्रशिक्षण कार्यक्रमापुरताच मर्यादित आहे. आणि २००६ पर्यंत स्त्री रोजगार प्रशिक्षण कार्यक्रम १८ गावांपैकी नायगांव, पिसर्वे, पारगांव, माळशिरस, टेकवडी व आंबळे या ६ गावानच राबविला गेला आहे.

## आर्थिक स्वावलंबन

मासूम या स्वयंसेवी संस्थेच्या स्त्री–रोजगार प्रशिक्षण कार्यक्रमामुळे स्त्रियांना आर्थिक व सामाजिक स्वावलंबन निश्चीतच प्राप्त झालेले आहे. वरील गृहीतकृत्य तथ्य आहे. परंतु, तरीही प्रामुख्याने आर्थिक स्वावलंबन प्राप्त होणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण खूपच कमी आहे. आणि त्यांचे उत्पन्नाचे प्रमाणही अल्पच आहे. त्यामुळे यात वाढ करण्यासाठी स्वयंसेवी संस्थांनी रोजगार प्रशिक्षण कार्यक्रमाबरोबरच रोजगार संधीही उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. असे जरी असले तरी ते रोजगार कार्यक्रमाचे अपयश नसून स्त्रियांच्या वैयक्तीक व



Scanned by CamScanner

सामाजिक अडचणीमुळे रोजगार कार्यक्रमावर मर्यादा आल्या आहेत. मात्र स्त्रियांना आपल्या प्रशिक्षणाचा योग्य वापर केल्यास त्यांच्या सबलीकरणात नक्कीच भर पडेल स्त्री–रोजगार प्रशिक्षण कार्यक्रमामुळे ग्रामीण भागातील महिलांना शेतमजूरी व्यतिरिक्त अन्य उत्पन्न स्त्रोत उपलब्ध झाला आहे. रोजगार प्रशिक्षणामुळे स्त्रिया वार्षिक किमान १२०० रू. पासून कमाल २४००० रू. पर्यत उत्पन्न मिळवित आहेत.

**महिला सबलीकरण**

महिला सबलीकरणामध्ये स्त्रियांचे विचार परिवर्तन हक्कांची जाणीव, समस्यांची सोडवूणक, आर्थिक स्वावलंबन प्राप्त करण्याची जाणीव हे घटक महत्त्वाचे असतात. प्रशिक्षण कार्यक्रमामुळे विविध कौटूंबीक, सामाजिक स्तरावरील महिला दिवसातील काही वेळ एकत्र येतात. हे सर्वेक्षणाच्या वेळी दिसून आले. मासूम या स्वयंसेवी संस्थेमार्फत राबविल्या जाणाऱ्या या प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये विविध व्याख्याने, चर्चासत्र, कार्यक्रमामधून महिलांमध्ये जाणीव जागृती करण्याचा प्रयत्न केला जातो. आणि हे निश्चितच कौतुकास्पद आहे. अर्थाजनासाठी प्रशिक्षण आणि सामाजीक जागृतीसाठी अनंत कार्यक्रम याद्वारे महिला सबलीकरण शक्य आहे. प्रशिक्षण कार्यक्रम महिला सबलीकरणामध्ये महत्त्वाची भूमिका बजावतातच.

**उपाययोजना**

मासूम या स्वयंसेवी संस्थेमार्फत राबविल्या जाणाऱ्या स्त्री–रोजगार प्रशिक्षण कार्यक्रमाचे मूल्यमापन केल्यानंतर असे दिसून आले की, सरकारतर्फे महिलांच्या विकासासाठी राबविल्या जाणाऱ्या धोरणांना पुरक म्हणून स्वयंसेवी संस्थांच्या प्रशिक्षण कार्यक्रमाचा जास्तीत जास्त उपयोग महिला सबलीकरणासाठी व्हावा म्हणून पुढील उपाययोजना सुचविल्या आहेत.स्वयंसेवी संस्थांनी रोजगार प्रशिक्षण कार्यक्रमातंर्गत महिलांना केवळ प्रशिक्षण न देता रोजगार संधीही उपलब्ध करून देणे आवश्यक आहे ग्रामीण भागातील प्रशिक्षणार्थी स्त्रियांना एकत्रीतपणे एखादा उदयोग सुरू करून दिल्यास प्रशिक्षणाचा अपव्यय होणार नाही. आणि जास्तीत जास्त प्रशिक्षणार्थी लाभ मिळवू शकतील.

**उपलब्धता**

मासूम संस्थेच्या स्त्री रोजगार प्रशिक्षण कार्यक्रमांचा अभ्यास केले असता असे दिसून येते की रोजगार प्रशिक्षण कार्यक्रमामुळे निश्चीतच स्त्रियांना शेतमजुरी व्यतिरीक्त उत्पन्न मिळवण्याचा अन्य स्त्रोत उपलब्ध होऊ शकतो पण त्यासाठी केवळ प्रशिक्षण देणे पुरेसे नाही तर रोजगार संधीही उपलब्ध करून देण्याचे प्रयत्न सुरु आहेत.

**संदर्भसुची**

१. कमल भागवत, मालती गाडगीळ, शांता केळकर, कुसुम रणदिवे मालिनी तळपुळे, शांता रानडे (१९८५) "स्त्री चळवळीची वाटचालष्प्रागतीक पुस्तक प्रकाशन, पुणे .
२. माधवी कवि (२००५) "महिला कल्याण आणि विकासष विद्या प्रकाशन, नागपूर
३. विद्युत भागवत, शर्मिला रेगे, वंदना पलसाने (१९९४) "स्त्री जीवनाची गुंतागुंतष, विकास अध्ययन केन्द्र, मुंबई.
४. शोभा पाटील (२००२) "स्त्रियांची आत्मचरित्रेः स्त्रीवादी शोधष्मल्हार प्रकाशन, पुणे .
५. विनया खडपेकर (१९९१) ष्स्त्री स्वातंत्र्यवादिनी (विसाव्या शतकातील परीवर्तन)" पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.
६. डॉ.निकम मुजाता शंकर)२००८(स्त्री रोजगार प्रशिक्षण कार्यक्रम : एक अभ्यास)मासूम संस्था,पुणे संदर्भात(, M.Phil Thesis T.M.V Pune.

Scanned by CamScanner